# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/10/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि.मी. दहेगाव जोशी येथे दिनांक 06/10/2020 चे 02.20 वा. ते 04.30 वा. फिर्यादी नामे– हिरालाल श्रावणजी पिंपळकर, वय 47 वर्ष, रा. दहेगाव जोशी यांचे राहते घरातील मागील दाराची कडी अज्ञात आरोपीन तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरामधील लोखंडी कपाटातील साडयानमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने 39,000/–रू. व नगदी 7,000/–रू. असा एकुण किं. 46,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री उबाळे 8830332007 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 05/10/2020 चे 14:00 वा. ते 14.30 वा. चे सुमारास 14 वर्षीय पीडित/फिर्यादी हि तीचे स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखा मेटपांजरा या बॅकेचे पासबुक घेण्याकरिता घरून रामदेव बाबा कॉलेज डोरली येथे आजोबा यांच्याकडे पायदळ एकटीच जात असतांना आरोपी नामे– सुशिल सारंग सुरतकर, रा. डोरली भिंगारे, ता. कळमेश्वर याने फिर्यादीला थांबण्यासाठी सांगीतल्याने फिर्यादी तेथेच थांबली असता आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन म्हणाला की, ''मला तुझ्या सोबत बोलायचे आहे, त्यावर फिर्यादीने म्हटले की, मला तुझ्यासोबत बोलायचे नाही'' असे सांगून जात असतांना आरोपीने फिर्यादीच्या मनास लज्जा निर्माण होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(अ) भादंवि. सहकलम 5, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री खडसे हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक 05/10/2020 चे 22.00 वा. ते दिनांक 06/10/2020 चे 04.30 वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्यीत फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय 15 वर्ष हि तिचा मामा यांच्या कडे मागील 10 दिवसापासून भेटण्याकरीता गेली असता आरोपी नामे– नितेश मदारकर, रा. पांजरा, ता. तुमसर जि. भंडारा याने तिला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले. .

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक तकीत 8766934595 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर